नि. दि.दा.क्र. ७९/२०२०
**ज्ञानेश्वर वि. चंद्रशेखर**

**<u>नि.क्र.२० वरील आदेश</u>**

प्रतिवादी क्र. १३ यांच्यातर्फे कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करणेसाठी अर्ज दाखल आहे.

२. अर्ज वाचला. त्यावरील वादीच्या म्हणण्याचे अवलोकन केले. उभय पक्षाच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

३. प्रतिवादी क्र. १३ यांच्या म्हणण्यानुसार, त्यांना कैफियत देण्याकामी आवश्यक ते माहीतीचे कागदपत्र उशीरा प्राप्त झाले. त्यानंतर कोरोना रोगाचा प्रार्दुभाव देशात चालु असल्याने त्यांना कैफियत देण्याकामी २५० दिवसांचा उशीर झालेला आहे. सदरचा विलंब हा योग्य कारणांसाठी झालेला आहे. वादमिळकतीमध्ये प्रतिवादीचे हितसंबंध गुंतलेले आहेत. त्यामुळे, विलंब माफ करुन त्याची कैफियत स्वीकारण्यात यावी, अशी त्यांची विनंती आहे.

४. वादी यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी यांनी जाणुन-बुजुन उशीरा म्हणणे दाखल केलेले आहेत. दाव्याला उशीर व्हावा म्हणुन त्यांनी उशीरा कैफियत दाखल केलेली आहे. अर्ज नामंजुर करण्याची त्यांची विनंती आहे.

५. संचिकेचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १३ यांच्यावर दिनांक ०५.३.२०२० रोजी नि.क्र. ११ अन्वये समन्सची बजावणी झाल्याचे दिसुन येते. सदर कालावधी नंतर अर्थात २०२० च्या मार्च महिन्या अखेरपासुन जवळपास एक वर्ष किंवा जास्त कालावधीत कोवीड-१९ च्या संसर्गामुळे न्यायालयीन

कामकाज पुर्ण क्षमतेने चालु नव्हते, ही वस्तुस्थिती आहे. प्रस्तुतचा अर्ज हा दिनांक ०८.०२.२०२१ रोजी दाखल करण्यात आलेला आहे.

६. दिवाणी प्रक्रिया संहितेतील तरतुदी हया न्याय दानासाठी पुरक आणि पोषक असुन, त्या लवचीक आहेत. कोवीड–१९ चा प्रार्दुभाव लक्षात घेता, अर्ज दाखल करण्यास प्रतिवादी यांनी जाणुन–बुजुन उशीर केला नसल्याचे दिसुन येते. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर स्वीकारल्यावर दाव्याचा निकाल गुणतत्वावर देण्यास मदत होणार आहे. अर्ज मंजुर केल्यावर वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(श्रीमती.भा.का.पाटील)
दि.२४.०१.२०२२
२ रे दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
नेवासा